राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ पुणे यांच्यासमोरील
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नविन प्रशासकीय इमारत,
विधान भवन समोर,पुणे-४११००१

श्री.रामचंद्र नारायण जाधव
२७, बालसम्राट चौक, सांगलीवाडी सांगली.

सुनावणी दिनांक-२६/०९/२०२५

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये खालील प्राधिकरणांकडे एकूण ८१ द्वितीय अपिले (लगतच्या यादीनुसार) दाखल केलेली आहेत.

| अ.क्र. | प्राधिकरणाचे नाव | अपिल संख्या |
|---|---|---|
| १ | सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका. | २६ |
| २ | न्यू आदर्श माध्यमिक विद्यामंदिर आदर्शनगर जुना वासूंबे रोड,विटा जि. सांगली. | २ |
| ३ | पंचायत समिती जत जि. सांगली. | ४ |
| ४ | तहसिल कार्यालय कडेगाव,जि. सांगली. | ५ |
| ५ | पंचायत समिती कवठेमहांकाळ | १ |
| ६ | सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,सांगली. | २ |
| ७ | दिघंची हायस्कूल व आर.एम. कलाल ज्युनिअर कॉलेज,दिघंची ता. आटपाडी | २ |
| ८ | पंचायत समिती मिरज | १७ |
| ९ | जिल्हा परिषद सांगली. | ५ |
| १० | पंचायत समिती तासगाव | ६ |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

| | | |
|---|---|---|
| ११ | उपविभागीय अधिकारी कार्यालय सोलापूर क्रमांक १ सोलपूर | १ |
| १२ | माध्यमिक विद्यालय विजयनगर किंदरवाडी ता.तासगाव | २ |
| १३ | उपवणसंरक्षक वनविभाग सांगली यांचे कार्यालय,वनवसाहत हनुमान नगर,कुपवाड | २ |
| १४ | जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली | १ |
| १५ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,सांगली. | १ |
| १६ | पंचायत समिती आटपाडी | ४ |

प्रस्तुतची व्दितीय अपीले दाखल करतांना प्रयोजनामध्ये, अपुरी माहिती दिली, मुदतीत माहिती दिली नाही, असे प्रयोजन नमूद केलेली आहेत. सदर व्दितीय अपीलांची सुनावणी दि.२६/०९/२०२५ रोजी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी संबंधित प्राधिकरणांचे बहुतांश जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

१. आज रोजी सुनावणी दरम्यान उक्त प्राधिकरणांच्या जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अत्यंत व्यापक, विस्तृत स्वरुपाची आहे. तरीही अपिलार्थीच्या बहुतांश अर्जावर कार्यवाही करुन त्यांना उपलब्ध माहिती /उत्तर पुरविली आहे.

२. सुनावणी दरम्यान उपस्थित सर्व जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थी यांच्या मोठ्या प्रमाणावर वारंवार माहिती अर्ज करण्याच्या कारणाबद्दल तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपील व व्दितीय सादर करण्याच्या प्रयोजनामधील कारणांबाबत विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की, अपिलार्थी सतत माहिती अर्ज करुन, प्रशासनास त्रास देत असतात, त्यांना उपलब्ध माहिती पुरविली आहे, त्यांच्या माहिती अर्जावर मुदतीत कार्यवाही केली आहे.

३. सुनावणी दरम्यान उपस्थित सर्व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास कथन केले की, बहुतांश प्रकरणांमध्ये सुनावणी घेऊन आदेश पारित केला आहे.

४. अपिलार्थी यांच्या वारंवार माहिती अर्ज करण्यामुळे दैनंदिन शासकीय कामकाजावर विपरित परिणाम होतो. कारण अपिलार्थीच्या माहिती अर्जातील विस्तृत माहिती प्रथमतः एकत्रित /संकलित करुन ती अवलोकनास्तव देणे अपेक्षित आहे. अपिलार्थी हे माहिती अधिकारातंर्गत अभिप्रेत असलेली सकारात्मक भूमिका पार पाडण्याऐवजी नेहमी असहकार्याची भूमिका घेतात.

५. अपिलार्थी मोठया संख्येने द्वितीय अपिल आयोगाकडे दाखल करत असतात, त्यांना माहिती मिळविण्यामध्ये कुठलेही स्वारस्य नसते. माहिती अधिकाराचा सर्रास दुरुपयोग करुन सदर कायद्याचा शस्त्र (Tool) म्हणून वापर करत आहेत. त्यामुळे प्राधिकरणाच्या दैनंदिन कामकाजावर

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

अनिष्ठ परिणाम झाला असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास समक्ष सांगितले.

उपरोक्त पार्श्वभूमि विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी निर्णयाप्रत येताना, आयोगाने, मा. सर्वोच्च न्यायालय, केंद्रीय माहिती आयोग, यांनी विविध प्रकरणात दिलेले न्यायनिवाडे, अधिनियमाची प्रस्तावना, इत्यादि खालील नमूद बाबी विचारात घेतल्या आहेत.

१) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून अपिलार्थी यांनी वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे सादर केलेले माहिती अर्ज, प्रथम अपीले व राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेली द्वितीय अपीले यासाठी हेतुतः अवलंबलेली कार्यपद्धती याची पडताळणी अधिनियमाच्या प्रस्तावनेत नमुद तत्वांशी करण्यात आली. या अधिनियमाच्या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

" ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता यावी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधन संपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबीनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना, या परस्पर विरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षीत माहिती पुरविण्या करिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

(२) मा सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील.६४५४/२०११ दिनांक ०९.०८.२०११ रोजी Applicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors.Respondents या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to do their duty-Nation does not want a scenario where ७५ % of the staff of public authorities spend ७५% of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharge ing their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

३. मा उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.२०१८२, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being any useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility to those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

.(४) केंद्रीय माहिती आयोगाने CIC/LS/२०१२/०००८५८-SA ते ०००८७२-SA संदर्भात दिनांक ०४.०७.२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

Earlier Obervation of CIC : Shri. M.M.Ansari

"In several occasions earlier the Central Information Commission referred to the issue of repeated RTI requests and harassing tendency. In Prem Prakash Kumar V NFL, Panipat,(Decision No.२४६/IC(A)२००६, FNo.CIC/MA/A/२००६/००३७४ & ३७५ dated २८ August २००६) the applicant sought documents and specific comments of CPIO on ८९ queries. The learned Commissioner Shri M.M.Ansari observed that in fact, the nature of queries and information sought are such that the information seeker would never be satisfied because the promotion of self-interest, rather than public interest was dominant as the appellant had sought redressed of grievances. "

५. मा. शैलेश गांधी यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ चा कायदेशीर हत्यार म्हणून करत आहेत, जो अत्यंत त्रासदायक स्वरुपाचा आहे. याबाबत खालीलप्रमाणे निरीक्षण नमूद केले आहे

It is relevant here to quote a paragraph from the order of Learned Information Commissioner Shri Shailesh Gandhi in case numbers No.CIC/SG/C/ २०११/०००७६०, CIC/SM/२०११/ ०००९२६/ SG, CIC/SM/A/२०११/००१११९/SG, CIC/ SM/A/२०११/ ००२९०९ dated १७ th January, २०१२) in a second appeal "The commission, at several appellate hearing, has explained to the complainant that under RTI Act, only the information as per records can be made available, multiple RTI applications and appeals would not provide him any information beyond the records that exists. The Commission

recognizes the fact that valuable time of complainant, respondent public authority as well as the Commission is being spent in merely going through the motion prescribed under the RTI Act again and again to obtain similar information..... At this juncture the Commission would like to mention that the right to information is a fundamental right of the citizens, It cannot be used indiscriminately to fulfill the demand of one individual. In the present matter. It must be noted that the complainant is pursuing multiple litigation and various public authorities are being asked to divert and extraordinarily disproportionate amount of resources just to respond to hundreds of RTI applications filled by him....The Commission is also conscious of the fact that it is financed by the poorest man in this country who may be starving to death. The Complainant by repeatedly filling similar RTI application and appeals with the respondent public authority and the commission is wasting public resources."

तसेच असेही नमूद केले आहे की, वारंवार माहिती अर्ज करणारे अर्जदार हे माहितीची मागणी / प्रकटीकरण हे त्यांचा अंतस्थ व्यक्तिगत हेतु साध्य करण्यासाठी करतात, त्यामध्ये व्यक्तिगत हिताचा विचार असल्याने सार्वजनिक हित साध्य होणार नसते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद वैधानिक उद्देश स्पष्टपणे साध्य होत नाही.

तसेच मा. उच्च न्यायालय, कर्नाटक, धारवाड खंडपीठ येथील रिट पिटीशन नं १०१२६० /२०२४ (GM-RES) मध्ये दि २५.०९.२०२४ रोजी दिलेल्या आदेशात वारंवार मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज दाखल करणाऱ्या अर्जदाराचे अपील फेटाळलेले आहे.

प्रस्तूत प्रकरणी उपरोक्त न्यायनिवाडे तपशीलवाररित्या विचारात घेता आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद तरतूदीनुसार अपिलार्थीस माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा या कायद्याचा मुख्य हेतु आहे. तथापि अपिलार्थी यांनी विपरीत भूमिका घेऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग करण्यासाठी सुनियोजित पद्धतीने जाणीवपूर्वक व्यापक व अतिविस्तृत स्वरूपाच्या माहितीची मागणी करण्यासाठी मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपीले व त्यानुषंगाने मोठ्या संख्येने आयोगाकडे द्वितीय अपीले सादर केली आहेत.
२. अपिलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिलांची तपासणी केली असता अपिलार्थीने प्रस्तुत ८१ प्रकरणात मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची तसेच दिर्घ कालावधीची आहे. तरीही जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी माहिती अर्ज / अपिल अर्जावर कार्यवाही करुन उपलब्ध सर्व माहिती अपिलार्थीस पुरविली आहे, तरी देखील त्यांचे समाधान होत नाही. यास्तव, अपिलार्थी हे त्यांचा अंतस्थ हेतू साध्य करण्यासाठी माहिती अधिकार कायद्याचा हत्यार म्हणून वापर करत आहेत, असे आयोगाचे मत झालेले आहे.
३. अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चा वापर करून मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपीले आणि द्वितीय अपीले सादर करण्याच्या या कृतीशी कोणते व्यापक जनहित निगडित

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

आहे हे नमूद केले नाही, याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी ते आज रोजीच्या सुनावणीसाठी उपस्थित नाहीत. यावरुन त्यांना अपिल चालविण्यामध्ये स्वारस्य असल्याचे दिसून येत नाही

४. अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा (माहिती अधिकार) माफक पध्दतीने वापर करणे आवश्यक असूनही त्यांनी माहिती अधिकार कायद्याचा जाणीवपूर्वक अनिबंध व अवाजवी दुरुपयोग केला आहे. त्यामुळे संबंधित शासकीय कार्यालयाचा बहुमुल्य वेळ, साधनसामग्री व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या दैनंदिन शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झाला आहे.

५. अशा मोठ्या प्रमाणावर अर्ज करण्याच्या कार्यपद्धती मुळे गरजवंत अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीस गतीरोध निर्माण होत आहे. त्याचा निश्चितपणे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे.

६. अपिलार्थी यांनी त्यांच्या बहुतांश माहिती अर्जात व्यापक व विस्तृत स्वरुपाची माहिती मागणी केलेली आहे. तरी देखील जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी माहिती अर्ज व अपिलीय अर्जावर कार्यवाही केलेली आहे.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व मा. केंद्रीय माहिती आयोगाकडील अशा प्रकरणी वेळोवेळी दिलेले, ऐतिहासिक, क्रांतीकारी व लक्ष्यवेधी निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होत आहे व संबंधित शासकीय खात्यांचा / प्राधिकरणांचा बहुमूल्य वेळ वाया जात असल्याचे दिसून येते. ही बाब माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झाले आहे.

सबब, अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपिलांमध्ये कोणतेही तथ्य किंवा गुणवत्ता आढळून येत नसल्यामुळे व त्यातून कोणतेही जनहित साध्य होत नसल्यामुळे, अपिलार्थीने दाखल केलेली सर्व द्वितीय अपिले कोणत्याही निर्देशाविना फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश.**

अपिलार्थी यांची सर्व ८१ व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जा.क्र.--9691/2025-- दिनांक :- 27/10/2025

| अ. क्र. | अपिल क्रमांक | अपिल वर्ष | जिल्हा | अपिलार्थीचे नाव | जन माहिती अधिकारी पदनाम,जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय | प्रथम अपिलीय अधिकारी पदनाम,प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९९९ | २०२३ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | नगर अभियंता,बांधकाम विभाग (मुख्यालय) सांगली मिरज कुपवाड शहर महापालिका, सांगली | शहर अभियंता,सांगली मिरज कुपवाड शहर महापालिका, सांगली |
| २ | २००६ | २०२३ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | नगर अभियंता,बांधकाम विभाग (मुख्यालय) सांगली मिरज कुपवाड शहर महापालिका, सांगली | शहर अभियंता,सांगली मिरज कुपवाड शहर महापालिका, सांगली |
| ३ | १८७ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका. | प्रथम अपिलीय अधिकारी,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका. |
| ४ | १८८ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका. | प्रथम अपिलीय अधिकारी,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका. |
| ५ | १८९ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | वरिष्ठ लिपीक,न्यू आदर्श माध्यमिक विद्यामंदिर आदर्शनगर जुना वासूंबे रोड,विटा जि. सांगली. | मुख्याध्यापक,न्यू आदर्श माध्यमिक विद्यामंदिर आदर्शनगर जुना वासूंबे रोड,विटा जि. सांगली. |
| ६ | १९० | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | वरिष्ठ लिपीक,न्यू आदर्श माध्यमिक विद्यामंदिर आदर्शनगर जुना वासूंबे रोड,विटा जि. सांगली. | मुख्याध्यापक,न्यू आदर्श माध्यमिक विद्यामंदिर आदर्शनगर जुना वासूंबे रोड,विटा जि. सांगली. |
| ७ | १९१ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | कक्ष अधिकारी,पंचायत समिती जत जि. सांगली. | गट विकास अधिकारी,पंचायत समिती जत जि. सांगली. |
| ८ | १९२ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | कक्ष अधिकारी,पंचायत समिती जत जि. सांगली. | गट विकास अधिकारी,पंचायत समिती जत जि. सांगली. |
| ९ | १९३ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत जिरग्याळ,ता. जत,जि. सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती जत,ता. जत,जि. सांगली. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | १९४ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | मंडळ अधिकारी,मंडळ अधिकारी कार्यालय वांगी,ता. कडेगाव,जि. सांगली. | तहसिलदार,तहसिल कार्यालय कडेगाव,जि. सांगली. |
| ११ | १९५ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | मंडळ अधिकारी,मंडळ अधिकारी कार्यालय कडेगाव,ता. कडेगाव,जि. सांगली. | तहसिलदार,तहसिल कार्यालय कडेगाव,जि. सांगली. |
| १२ | १९६ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | मंडळ अधिकारी,मंडळ अधिकारी कार्यालय नेवरी,ता. कडेगाव,जि. सांगली. | तहसिलदार,तहसिल कार्यालय कडेगाव,जि. सांगली. |
| १३ | १९७ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | मंडळ अधिकारी,मंडळ अधिकारी कार्यालय चिंचणी (अं),ता. कडेगाव,जि. सांगली. | तहसिलदार,तहसिल कार्यालय कडेगाव,जि. सांगली. |
| १४ | १९८ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | मंडळ अधिकारी,मंडळ अधिकारी कार्यालय चिंचणी (अं),ता. कडेगाव,जि. सांगली. | तहसिलदार,तहसिल कार्यालय कडेगाव,जि. सांगली. |
| १५ | १९९ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | कक्ष अधिकारी,पंचायत समिती कवठेमहांकाळ,जि. सांगली. | गट विकास अधिकारी,पंचायत समिती कवठेमहांकाळ,जि. सांगली. |
| १६ | २०० | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | दुकाने निरीक्षक श्रेणी-१,सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,विश्रामबाग,उद्योग भवन,सांगली. | सहाय्यक कामगार आयुक्त,सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,विश्रामबाग,उद्योग भवन,सांगली. |
| १७ | २०१ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | दुकाने निरीक्षक श्रेणी-१,सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,विश्रामबाग,उद्योग भवन,सांगली. | सहाय्यक कामगार आयुक्त,सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,विश्रामबाग,उद्योग भवन,सांगली. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | २०२ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका. | प्रथम अपिलीय अधिकारी,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका. |
| १९ | ७८६ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | वरिष्ट लिपिक,दिघंची हायस्कूल व आर.एम. कलाल ज्युनिअर कॉलेज,दिघंची ता. आटपाडी,जि. सांगली | मुख्याध्यापक,दिघंची हायस्कूल व आर.एम. कलाल ज्युनिअर कॉलेज,दिघंची ता. आटपाडी,जि. सांगली.४१५३१५ |
| २० | ७८७ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | वरिष्ट लिपिक,दिघंची हायस्कूल व आर.एम. कलाल ज्युनिअर कॉलेज,दिघंची ता. आटपाडी,जि. सांगली | मुख्याध्यापक,दिघंची हायस्कूल व आर.एम. कलाल ज्युनिअर कॉलेज,दिघंची ता. आटपाडी,जि. सांगली.४१५३१५ |
| २१ | ७८८ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,पंचायत समिती जत. जि. सांगली. | गट विकास अधिकारी,पंचायत समिती जत. जि. सांगली. |
| २२ | ७८९ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | सहाय्यक प्रशासन अधिकारी,पंचायत समिती मिरज जि. सांगली. | गट विकास अधिकारी,पंचायत समिती मिरज जि. सांगली. |
| २३ | ७९० | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | सहाय्यक प्रशासन अधिकारी,पंचायत समिती मिरज जि. सांगली. | गट विकास अधिकारी,पंचायत समिती मिरज जि. सांगली. |
| २४ | ७९१ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | सहाय्यक प्रशासन अधिकारी,पंचायत समिती मिरज जि. सांगली. | गट विकास अधिकारी,पंचायत समिती मिरज जि. सांगली. |
| २५ | ७९२ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | लेखाधिकारी,सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी,सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |
| २६ | ७९३ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद सांगली. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २७ | ७९४ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद सांगली. |
| २८ | ८०५ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत लिंगनूर ता. मिरज जि. सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज जि. सांगली. |
| २९ | ८०६ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत लिंगनूर ता. मिरज जि. सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज जि. सांगली. |
| ३० | ८०७ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत लिंगनूर ता. मिरज जि. सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज जि. सांगली. |
| ३१ | ८०८ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | नगर अभियंता,सार्व. बांधकाम विभाग मुख्यालय सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | शहर अभियंता,सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |
| ३२ | १०५७ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत धामणी,ता.तासगाव जि. सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती तासगाव जि.सांगली. |
| ३३ | १०५८ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | नगररचनाकार,नगररचना विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | सहा. संचालक नगररचना,नगररचना विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |
| ३४ | १०५९ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज जि. सांगली. | गटविकास अधिकारी,पंचायत समिती मिरज जि. सांगली. |
| ३५ | १०६० | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती तासगाव जि. सांगली. | गटविकास अधिकारी,पंचायत समिती तासगाव जि. सांगली. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३६ | १०६१ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | १) कनिष्ठ प्रशासन अधिकारी २) ग्रामसेवक,१) पंचायत समिती तासगाव जि. सांगली. २) ग्रामपंचायत धामनी ता. तासगाव जि. सांगली. | गटविकास अधिकारी,पंचायत समिती तासगाव जि. सांगली. |
| ३७ | १०६२ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती तासगाव जि. सांगली. | गटविकास अधिकारी,पंचायत समिती तासगाव जि. सांगली. |
| ३८ | १५८४ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | शिक्षण विस्तार अधिकारी,पंचायत समिती तासगाव,जि. सांगली. | गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती तासगाव,जि. सांगली. |
| ३९ | १५८५ | २०२५ | सोलापूर | रामचंद्र नारायण जाधव | नायब तहसिलदार,उपविभागीय अधिकारी कार्यालय सोलापूर क्रमांक १ सोलपूर. | उपविभागीय अधिकारी,उपविभागीय अधिकारी कार्यालय सोलापूर क्रमांक १ सोलपूर. |
| ४० | २०५९ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,आरोग्य अधिकारी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका. | प्रथम अपिलीय अधिकारी,आरोग्य अधिकारी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका. |
| ४१ | २०६० | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,आरोग्य अधिकारी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका. | प्रथम अपिलीय अधिकारी,आरोग्य अधिकारी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका. |
| ४२ | २०६१ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,आरोग्य अधिकारी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका. | प्रथम अपिलीय अधिकारी,आरोग्य अधिकारी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४३ | २०६२ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,विद्युत विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका. | प्रथम अपिलीय अधिकारी,विद्युत विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका. |
| ४४ | २०६३ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | कनिष्ठ लिपिक,सामान्य प्रशासन विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका. | प्रथम अपिलीय अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका. |
| ४५ | २०६४ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |
| ४६ | २०६५ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |
| ४७ | २०६६ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | लिपिक,माध्यमिक विद्यालय विजयनगर किंदरवाडी ता.तासगाव,जि. सांगली. | मुख्याध्यापक,माध्यमिक विद्यालय विजयनगर किंदरवाडी ता.तासगाव,जि. सांगली. |
| ४८ | २०६७ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | लिपिक,माध्यमिक विद्यालय विजयनगर किंदरवाडी ता.तासगाव,जि. सांगली. | मुख्याध्यापक,माध्यमिक विद्यालय विजयनगर किंदरवाडी ता.तासगाव,जि. सांगली. |
| ४९ | २०६८ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,लेखा विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी,लेखा विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |
| ५० | २०६९ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | २०७० | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,लेखा विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी,लेखा विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |
| ५२ | २२६७ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | मुख्यलेखापाल,उपवणसंरक्षक वनविभाग सांगली यांचे कार्यालय,वनवसाहत हनुमान नगर,कुपवाड ता.मिरज जि.सांगली. | उपवनसंरक्षक,उपवणसंरक्षक वनविभाग सांगली यांचे कार्यालय,वनवसाहत हनुमान नगर,कुपवाड ता.मिरज जि.सांगली. |
| ५३ | २२६८ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | मुख्यलेखापाल,उपवणसंरक्षक वनविभाग सांगली यांचे कार्यालय,वनवसाहत हनुमान नगर,कुपवाड ता.मिरज जि.सांगली. | उपवनसंरक्षक,उपवणसंरक्षक वनविभाग सांगली यांचे कार्यालय,वनवसाहत हनुमान नगर,कुपवाड ता.मिरज जि.सांगली. |
| ५४ | २२६९ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | निवडणुक नायब तहसिलदार (निवडणूक शाखा),जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली. | उप जिल्हा निवडणुक अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली. |
| ५५ | २२७० | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | उप शिक्षणाधिकारी,प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली. | शिक्षणाधिकारी,प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली. |
| ५६ | २२७१ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | अधिक्षक (सारासे),प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली. | शिक्षणाधिकारी,प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली. |
| ५७ | २२७२ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय नागाव कवठे,ता.तासगाव जि.सांगली. | विस्तार अधिकारी (ग्रापं),पंचायत समिती तासगाव ता.तासगाव जि.सांगली. |
| ५८ | २२७३ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | उप अभियंता,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | शहर अभियंता,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५९ | २२७४ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | क. लिपिक,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | प्र. मुख्य उद्यान पर्यवेक्षक,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |
| ६० | २२७५ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | अधिक्षक (सारासे),माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली. | उप शिक्षणाधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सांगली. |
| ६१ | २४६४ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | उपविभागीय अधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग,मिरज जि.सांगली. | कार्यकरी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,सांगली. |
| ६२ | २४६५ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज ता.मिरज जि.सांगली. | गट विकास अधिकारी (निवड श्रेणी),पंचायत समिती मिरज ता.मिरज जि.सांगली. |
| ६३ | ३१५८ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय गुंडेवाडी ता.मिरज जि.सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज ता.मिरज जि.सांगली. |
| ६४ | ३१५९ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय कदमवाडी ता.मिरज जि.सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज ता.मिरज जि.सांगली. |
| ६५ | ३१६० | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय संतोषवाडी ता.मिरज जि.सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज ता.मिरज जि.सांगली. |
| ६६ | ३१६१ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय लक्ष्मीवाडी ता.मिरज जि.सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज ता.मिरज जि.सांगली. |
| ६७ | ३१६२ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय डोंगरवाडी ता.मिरज जि.सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज ता.मिरज जि.सांगली. |
| ६८ | ३१६३ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय निळजी बामणी ता.मिरज जि.सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज ता.मिरज जि.सांगली. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६९ | ३१६४ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय मुढेवाडी ता.आटपाडी जि.सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती आटपाडी ता.आटपाडी जि.सांगली. |
| ७० | ३१६५ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय जानरावबाडी ता.मिरज जि.सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज ता.मिरज जि.सांगली. |
| ७१ | ३१६६ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय खाजोडवाडी ता.आटपाडी जि.सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती आटपाडी ता.आटपाडी जि.सांगली. |
| ७२ | ३१६७ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय पुजारवाडी ता.मिरज जि.सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज ता.मिरज जि.सांगली. |
| ७३ | ३१६८ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय दिघंची ता.आटपाडी जि.सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती आटपाडी ता.आटपाडी जि.सांगली. |
| ७४ | ३१६९ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय पुजारवाडी (दि) ता.मिरज जि.सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती मिरज ता.मिरज जि.सांगली. |
| ७५ | ३१७० | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय य पा वाडी ता.आटपाडी जि.सांगली. | विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती आटपाडी ता.आटपाडी जि.सांगली. |
| ७६ | ३१७१ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | वरिष्ठ लिपीक,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | आरोग्याधिकारी,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |
| ७७ | ३१७२ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | वरिष्ठ लिपीक,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | आरोग्याधिकारी,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |
| ७८ | ३१७३ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | वरिष्ठ लिपीक,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | आरोग्याधिकारी,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७९ | ३१७४ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | वरिष्ठ लिपीक,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | आरोग्याधिकारी,आरोग्य विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |
| ८० | ३१७५ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,बांधकाम विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी,बांधकाम विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |
| ८१ | ३१७६ | २०२५ | सांगली | रामचंद्र नारायण जाधव | जन माहिती अधिकारी,विद्युत विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी,विद्युत विभाग सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ